**Academic Calendar – 2025-26**

(Subject–Wise and Grade-Wise Distribution of Course Content)

Subject: MARATHI Grade (Class): IX

| Sr. No. | Month & Year | Unit No./ Chapter No. /Topic No. | Name of Unit/Chapter/ Topic/Sub-topic | Remark, if any. |
|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०२५ | | पत्र लेखन - अनौपचारिक (रचना)<br>पत्र लेखन - औपचारिक (रचना)<br>संवाद (रचना)<br>गोष्ट (रचना)<br>उतारा (रचना)<br>वृत्तान्त लेखन (रचना)<br>निबंध (रचना) | |
| २ | जून २०२५ | ३ | तसा तूं भज रे (कविता) | |
| | | ५ | प्रमाण (कविता) | |
| | | १ | तारा आणि जंतू (पाठ) | |
| | | | वाक्प्रचार (अर्थ आणि वाक्य),<br>शब्दसमूहाबद्दल एक शब्द, शब्दांच्या जाती,<br>अचूक शब्द, (व्याकरण) | |
| | | | पत्र लेखन - अनौपचारिक (रचना) | |
| ३ | जुलै २०२५ | ४ | छत्रीपुराण (पाठ) | |
| | | ६ | प्रयोगशील शेतकरी - श्री संजय अनंत पाटील (पाठ) | |
| | | ३ | असा हा आसाम! (पाठ) | |
| | | | वाक्प्रचार (अर्थ आणि वाक्य),काळ, वचन, लिंग (व्याकरण) | |
| | | | संवाद (रचना)<br>उतारा (रचना) | |
| ४ | ऑगस्ट २०२५ | ७ | म्हणी अशा बहुगुणी (पाठ) | |
| | | ६ | हा देश माझा (कविता) | |
| | | | वाक्प्रचार (अर्थ आणि वाक्य),विशेषण,<br>भाववाचक नाम बनवा,विरामचिन्हे (व्याकरण) | |
| | | | गोष्ट (रचना)<br>वृत्तान्त लेखन (रचना) | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | सप्टेंबर २०२५ | २ | अनंत ब्रह्मांडे (कविता) | |
| | | १० | जगत्कृपाळा तुझी लेकरे (कविता) | |
| | | | समानार्थी शब्द, विरूध्दार्थी शब्द, शुध्द वाक्य ओळखणे (व्याकरण) | |
| | | | निबंध (रचना) | |
| ६ | ऑक्टोबर २०२५ | ८ | अंगण (पाठ) | |
| | | | उतारा (रचना) | |
| | | | | |
| ७ | नोव्हेंबर २०२५ | २ | मी लेखक कसा झालो? (पाठ) | |
| | | १ | उडाली पक्षिणी (कविता) | |
| | | | वाक्प्रचार (अर्थ आणि वाक्य),शब्दांच्या जाती, काळ,शब्दसमूहाबद्दल एक शब्द (व्याकरण) | |
| | | | पत्र लेखन - औपचारिक (रचना) | |
| ८ | डिसेंबर २०२५ | ९ | नामदेव (पाठ) | |
| | | ४ | बिकट वाट (कविता) | |
| | | | वाक्प्रचार (अर्थ आणि वाक्य),विशेषण, भाववाचक नाम बनवा,अचूक शब्द (व्याकरण) | |
| | | | वृत्तान्त लेखन (रचना) | |
| ९ | जानेवारी २०२६ | १० | आधी लगीन कोंढाण्याचं (पाठ) | |
| | | ८ | बाप (कविता) | |
| | | ९ | गावाकडून येताना (कविता) | |
| | | | विरामचिन्हे,शुध्द वाक्य ओळखणे (व्याकरण) | |
| | | | निबंध (रचना) | |
| १० | फेब्रुवारी २०२६ | ५ | महिला शास्त्रज्ञ डॉ. कमला सोहनी (पाठ) | |
| | | ७ | माझी मायबोली (कविता) | |
| | | | समानार्थी शब्द, विरूध्दार्थी शब्द, वचन, लिंग (व्याकरण) | |
| | | | गोष्ट (रचना) | |
| | | | संवाद (रचना) | |

# गोमंतधारा

## इयत्ता – नववी
## मराठी

२०२५

गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
आल्त बेती, पर्वरी–गोवा



वि. स. खांडेकर

# १ तारा आणि जंतू

**परिचय :** विष्णू सखाराम खांडेकर (१८९८-१९७६)– कादंबरीकार, कथाकार, लघुनिबंधकार, समीक्षक, पटकथालेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांना 'ज्ञानपीठ' तसेच 'पद्मभूषण' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 'रुपककथा' ही खांडेकरांनी मराठी कथेला दिलेली देणगी आहे.

**प्रसिद्ध साहित्य :** 'कांचनमृग', 'दोन ध्रुव', 'उल्का', 'दोन मने', 'हिरवा चाफा' इ. (कादंबऱ्या) 'वायुलहरी', 'चांदण्यात सायंकाळ', 'अविनाश' (लघुनिबंधसंग्रह) 'वनभोजन', 'धुंधुर्मास', 'गोकर्णीची फुले' इ. (समीक्षालेखसंग्रह), 'कलिका', 'सुवर्णकण', 'रुपेरी वाळू', 'वनदेवता' इ. (रुपककथासंग्रह). प्रस्तुत रुपककथेतून लेखकाने हे जीवन जसे ओंगळ जंतूंचे आहे, तसेच ते सुंदर चांदण्यांचेही आहे, हे स्पष्ट केले आहे.

---

ते दोघे मित्र लहानपणीच आपल्या खेड्यातून बाहेर जायला निघाले. वृद्ध गावकऱ्यांनी त्यांना उपदेश केला. "पोरांनो, आपलं गाव सोडून बाहेर कशाला जाताय? अरे, याच गावात तुमचे आजे, पणजे, खापरपणजे जन्माला आले. लहानाचे मोठे झाले. देवाघरी गेले. देवानं त्यांना कधी काही कमी पडू दिलं का? अरे देवदत्ता, बाबा भगदत्ता, तुम्हां दोघांना वेडबीड तर नाही ना लागलं? खुशाल इथं राहा. परमेश्वर देईल, ती मीठभाकर खा."



एका प्रमुख वृद्धाला उद्देशून देवदत्त म्हणाला, "नाही, आजोबा, मी नाही इथं राहणार. नदी डोंगर सोडून दूर दूर जाते, म्हणून ती समुद्रापर्यंत पोचते. मीही तसाच दूरदूर फिरत जाणार आहे. या गावात कुणालाही ठाऊक नसलेली एखादी विद्या शिकून येणार आहे." म्हातारेबुवा रागावले.

ते भगदत्ताकडे वळून म्हणाले, "नि तू, रे, पोरट्या? तू कसला दिग्विजय करणार आहेस? मिऱ्याएवढी झाली नाहीत पोरं नि चालली मेरुमांदाराला मिठ्या मारायला!" भगदत्त नम्रपणे उत्तरला, "आजोबा, मीही एखादी नवी विद्या शिकून येणार आहे. सर्वांच्या उपयोगी पडेल, अशी!"



Gomant Dhara Marathi-9_(Goa).indd 1 13-05-2025 06:39:19 PM

ते दोघे मित्र काही काळ बरोबर फिरत राहिले. त्यांनी शहरे पाहिली, खेडी पाहिली, उद्याने पाहिली. मग एके दिवशी देवदत्त भगदत्ताला म्हणाला, "हल्ली रोज रात्री मला एक स्वप्न पडतं. त्या स्वप्नात मी हिमालयाच्या शिखरावर उभा आहे आणि हातानं आकाशातली एकेक चांदणी खुडीत आहे, असं मला दिसतं."

भगदत्त म्हणाला, "तुझ्यासारखं मलाही रोज रात्री एक स्वप्न पडतं. मी खूप लहान झालो आहे, एक सूक्ष्म कीटक झालो आहे, अस्फुट कळीच्या आत शिरून लपंडाव खेळत आहे, पाण्याच्या एका थेंबात दडून बसलो आहे, असं काही तरी मला स्वप्नात दिसतं!"

दोघांनी आपापल्या स्वप्नाचा अर्थ लावण्याचा खूप प्रयत्न केला. पण काही केल्या त्यांना त्या स्वप्नाचा अर्थ कळेना. शेवटी देवदत्त अभिमानाने म्हणाला, "माझं स्वप्न भव्य आणि सुंदर आहे. तुझं क्षुद्र आणि कुरूप आहे. आपण मित्र असलो, तरी आपले मार्ग भिन्न आहेत, हे या स्वप्नांवरनं उघड होत आहे!"

भगदत्त काहीच बोलला नाही. दुसरे दिवशी ते दोघे मित्र आपापल्या स्वप्नांच्या मागून भिन्न भिन्न मार्गांनी चालू लागले. मात्र एकमेकांचा निरोप घेताना, जी विद्या मिळेल, तिचा आपल्या गावाच्या सेवेसाठी उपयोग करायचा, अशी दोघांनी शपथ घेतली.



बारा वर्षांनी त्या दोघां मित्रांची पुन्हा भेट झाली. दोघांनाही या अकल्पित पुनर्भेटीचा अत्यंत आनंद झाला. त्या आनंदावर अद्‌भुताचा कळसही चढला. अगदी निरनिराळ्या वाटांनी ते दोघे परत आपल्या गावी आले होते. पण एकाच दिवशी, एकाच वेळी!

आपण कोणती विद्या शिकून आलो आहे, हे देवदत्ताने सांगितले. तो एक यंत्र बरोबर घेऊन आला होता. त्या यंत्रातून रात्री आभाळाकडे पाहिले की, आकाशातल्या चांदण्या मोठ्या दिसू लागत. अगदी जवळ आल्यासारख्या भासत. निळ्या पारिजातकाच्या पांढऱ्याशुभ्र फुलांचा सडा पडत आहे आणि त्यांतली काही फुले आपल्यावर उधळली जात आहेत, असा त्या यंत्रातून पाहणाऱ्याला भास होई. सारे गाव देवदत्ताचे कौतुक करू लागले. देवदत्ताने स्वर्ग पृथ्वीवर आणला, असे म्हणू लागले. रोज रात्री देवदत्त लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना आपल्या यंत्राच्या साहाय्याने लखलखणाऱ्या तारामंडळात नेऊन सोडी. सारे गाव त्याच्यावर खूश झाले. देवदत्ताने गावाचे नाव मोठे केले, असे जो तो म्हणू लागला.



Gomant Dhara Marathi-9_(Goa).indd 2 13-05-2025 06:39:26 PM

एका म्हाताऱ्याने भगदत्ताला विचारले, "तू काही विद्या घेऊन आलायस, की नाही? का गेलास तसाच हात हलवीत परत आलास?" भगदत्त म्हणाला, "माझ्या विद्येत देवदत्तासारखं भव्य, दिव्य काही नाही. माझ्यापाशीही एक यंत्र आहे. त्यातून पाहिलं, की डोळ्यांना न दिसणारे बारीक बारीक जंतू दिसू लागतात." सारी मंडळी हे ऐकून खो खो हसू लागली. एक म्हातारेबुवा म्हणाले, "घाणेरडे किडे आणि जंतू एरवी काय थोडे बघतो आम्ही? ते मुद्दाम यंत्रातून बघायला कशाला जायचं? देवदत्त आम्हाला स्वर्गात नेतो. पण तुझ्याबरोबर या नरकात यायला कोण तयार होणार, बाबा! देवदत्तासारखं तूही गावाचं नाव मोठं करशील, असं आम्हाला वाटत होतं. पण तुझ्यासारख्या वेड्याला ते कसं जमणार? हिरा, तो हिरा, नि गारगोटी, ती गारगोटी!" भगदत्त गप्प बसला.

काही महिने लोटले. पावसाळा सुरू झाला. गावात माणसे पटापट आजारी पडू लागली. काही कारण नसताना त्यांना अकस्मात वांत्या होऊ लागत. काही केल्या त्या थांबत नसत. गावातल्या पिढीजाद वैद्यांनी या आजारी मंडळींना चूर्णे दिली, आसवे पाजली, अरिष्टे चाखवली. पण कुणालाही गुण येईना. सारा गाव भयभीत होऊन गेला. देवदत्त या विकाराने आजारी पडला. हळूहळू तो इतका गळून गेला की, आता आपण या दुखण्यातून उठतो, की नाही, अशी भीती त्याला वाटू लागली.

सारे गाव ज्या तळ्याचे पाणी पीत होते, तेच दूषित झाले असावे, असा भगदत्ताला संशय आला. त्याने ते पाणी आपल्या यंत्राच्या साहाय्याने तपासले. त्या पाण्यातले डोळ्यांना न दिसणारे सूक्ष्म जंतूंचे विचित्र जग त्याने आबालवृद्धांना दाखविले. पाणी उकळून शुद्ध करून पिण्याचा सल्ला त्याने गावाला दिला. आजाराला कंटाळलेल्या सर्व लोकांनी तो मुकाट्याने ऐकला. रोगाने गावातून पळ काढला.

आता जो तो भगदत्ताची स्तुती करू लागला. देवदत्त मागे पडला. त्याचे यंत्र म्हणजे करमणूक होती, असे म्हणून अनेक लोक त्याची निंदा करू लागले. रोगमुक्त झाल्यावर स्वत: देवदत्त एके दिवशी भगदत्ताला भेटायला आला. तो त्याला म्हणाला, "मित्रा, मी तुझ्यापेक्षा फार मोठी विद्या कमावली आहे, असा मला उगीचच गर्व झाला होता. माझ्या हातून तुझा कळत न कळत अपमान झाला असला, तर त्याबद्दल मला क्षमा कर. पण खरं सांगतो, तुझी विद्या माझ्यापेक्षा फार श्रेष्ठ आहे. तू नसतास तर माझे प्राण काही वाचले नसते!"

भगदत्त नम्रपणाने त्याला म्हणाला, "मित्रा, असं काही बोलू नकोस. तुझी विद्या फार फार श्रेष्ठ आहे. तिनं मला केवढा धीर दिला आहे, याची तुला कल्पना नाही." देवदत्त भगदत्ताकडे आश्चर्याने पाहू लागला. भगदत्त पुढे बोलू लागला. "मित्रा, विद्या शिकताना पावलोपावली क्षुद्र जंतूंशी आणि मलिन कीटकांशी माझा संबंध येत होता. मी शास्त्र शिकलो, पण कुरूप, ओंगळ कीटकांच्या सतत सहवासानं आणि जंतूंच्या दर्शनानं माझी मन:स्थिती मोठी विचित्र झाली होती. सारं जग मला ओंगळ वाटू लागलं होतं.



Gomant Dhara Marathi-9_(Goa).indd 3 13-05-2025 06:39:26 PM

जंतूंच्या भक्ष्यस्थानी पडण्याकरिता परमेश्वरानं मनुष्याला निर्माण तरी कशाला केले, असे मला वाटू लागले होते. माझ्या ज्ञानामुळे भव्यतेवरला आणि दिव्यत्वावरला माझा सारा विश्वास उडाला होता. पण इथं परत आल्यावर मी तुझ्या यंत्राच्या मदतीनं आकाशातल्या चांदण्यांशी गुजगोष्टी करू लागलो. मग माझा तो विश्वास पुन्हा जागृत झाला. हे जीवन जसं ओंगळ जंतूंच आहे, तसंच ते सुंदर चांदण्यांचंही आहे. मला हे तुझ्यामुळं कळलं!"

**( वनदेवता )**

**शब्दार्थ व टीपा :**

**दिग्विजय** – दाही दिशांवरती विजय, विश्वविजय
**मेरुमांदार** – दोन श्रेष्ठ पर्वत
**अस्फुट कळी** – न उमललेली कळी
**ओंगळ** – किळसवाणे
**अकल्पित** – ज्याची कल्पनाही करता येणार नाही असे
**तारामंडळ** – नक्षत्रांचा समूह, आकाश
**आबालवृद्ध** – लहानांपासून थोरांपर्यंत
**आसवे** – औषधी वनस्पतींच्या रसापासून तयार केली जाणारी औषधे
**अरिष्टे** – औषधी वनस्पती शिजवून त्या काढ्यापासून तयार केली जाणारी औषधे

**वाक्प्रचार व अर्थ :**

**हात हलवित परत येणे** – काही न मिळवता परत येणे

**अचूक पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करुन पुन्हा लिहा.**

**अ ) दोघे मित्र लहानपणीच खेड्यातून बाहेर जायला निघाले कारण** ............................

- त्यांना धन मिळवायचे होते.
- त्यांना खेड्यात राहून कंटाळा आला होता.
- त्यांना विद्या मिळवायची होती.
- त्यांना फिरायची खूप आवड होती.

**ब ) भगदत्ताने आणलेल्या यंत्रातून** ............................

- आकाशातल्या चांदण्या दिसायच्या.
- डोळ्यांना न दिसणारे बारीक जंतू दिसायचे.
- पांढऱ्याशुभ्र फुलांचा सडा दिसायचा.
- हिमालयाचे शिखर दिसायचे.

**खालील उद्गार कोणी- कोणास उद्देशून काढले आहेत, ते लिहा.**

१) "तुझी विद्या फार फार श्रेष्ठ आहे."

२) "हल्ली रोज रात्री मला एक स्वप्न पडतं."

**खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) भगदत्ताने गावाला कोणता सल्ला दिला?

२) सारे गाव देवदत्तावर खुश का झाले?

३) देवदत्त व भगदत्ताने कोणती शपथ घेतली?

**खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यांत लिहा.**

१) भगदत्ताने म्हाताऱ्याला नम्रपणे काय सांगितले?

२) भगदत्ताला स्वप्नात काय दिसत असे?

**खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यांत लिहा.**

१) सारे गाव भयभीत का झाले?

२) वृद्ध गावकऱ्यांनी दोन्ही मित्रांना कोणता उपदेश केला?

३) रोगमुक्त झाल्यावर देवदत्तने भगदत्ताला भेटून काय सांगितले?

**उपक्रम–**

वि. स. खांडेकर यांच्या रुपककथांचे सादरीकरण करा.



Gomant Dhara Marathi-9_(Goa).indd 5 13-05-2025 06:39:26 PM

# ३ तसा तूं भज रे!



संत सोहिरोबानाथ आंबिये

**परिचय : संत सोहिरोबानाथ आंबिये (इ. स. १७१४-१७९२)–** हे गोमंतकीय संतकवी असून भक्ती, ज्ञान, वैराग्य यांची शिकवण देणारी शेकडो पदे त्यांनी रचली आहेत.

**प्रसिद्ध साहित्य :** 'अक्षयबोध', 'पूर्णाक्षरी', 'अद्वयानंद' इ.

प्रस्तुत पदात सोहिरोबांनी भक्ताने भक्ती करुन भगवंताच्या जवळ कसे जायचे हे उदाहरणांमधून स्पष्ट केले आहे.

तसा तूं भज रे! आपुल्या मुळाला ।।ध्रु०।।
न दावितां गोडी। गुंतुनियां चाडी।
शोधूनि काढी जसि मुंगी गुळाला ।।१।।
कोठें तें वन, कोठें जीवन। धांवत कोरी भ्रमर जैसा कमळाला ।।२।।
चंदन अंग उमजुनि चांग। जडला तो नाग जसा कीं परिमळाला ।।३।।
म्हणे सोहिरा, देव भक्त एकचि होती।
ज्योतीला ज्योती मिळोनि जाय। जसें लवण जळाला ।।४।।

**शब्दार्थ व टीपा :**

**चाडी** – आवडी
**भ्रमर** – भुंगा
**चांग** – चांगले
**परिमळ** – सुगंध
**लवण** – मीठ

**अ ) कंसातील अचूक पर्याय रिकाम्या जागी लिहून ओळी पूर्ण करून लिहा.**

१) म्हणे सोहिरा .................... भक्त एकचि होती। (भगवंत, परमेश्वर, ईश्वर, देव)
२) चंदन अंग .................... चांग। (मानुनि, समजुनि, उमजुनि, जाणुनि)

**खालील प्रश्नाचे उत्तर तीन ते चार वाक्यांत लिहा.**

१) भक्ताने देवाला आपलेसे करावे हे सांगताना सोहिरोबानाथांनी कोणकोणती उदाहरणे दिली आहेत?



Gomant Dhara Marathi-9_(Goa).indd 59 13-05-2025 06:39:53 PM

| ५ | # प्रमाण |
|---|---|

**कृ. ना. आठल्ये**

**परिचय : कृष्णाजी नारायण आठल्ये (१८५३-१९२६)–** हे चित्रकार, टीकाकार, निबंधकार, संपादक व कवी म्हणून प्रसिद्ध होते. कवितेतील चित्रमयतेमुळे त्यांना शृंगेरी मठाच्या शंकराचार्यांकडून 'महाराष्ट्र चित्रमयूर' ही पदवी प्राप्त झाली होती. त्यांनी 'केरळकोकिळ' नावाचे मासिक सुरु करुन २५ वर्षे चालविले. प्रबोधनकार ठाकरे यांनी गुरुपदाचा मान त्यांना दिला होता.

**प्रसिद्ध साहित्य :** लोकहितवादी, विवेकानंद (चरित्र) 'श्वेतांबरा' (कादंबरी)

जीवनात प्रमाणाला अतिशय महत्त्व आहे. प्रत्येक गोष्ट प्रमाणशीर असली पाहिजे असा संदेश कवीने या कवितेतून दिलेला आहे.

अती कोपतां कार्य जातें लयाला
अती नम्रता पात्र होते भयाला
अती काम ते कोणतेंही नसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ।।१।।

अती मोह हा दु:ख-शोकासि मूळ
अती काळजी टाकणें हेंहि खूळ
सदा चित्त हें सद्‌विचारें कसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ।।२।।

अती वाद घेतां दुरावेल सत्य
अती 'होस हो' बोलणे नीचकृत्य
विचारें तुवां ज्ञानमार्गी घुसावें
प्रमाणामधें सर्व काही असावें ।।३।।

अती औषधें वाढवीतात रोग
उपेक्षा अती आणिते सर्व भोग
हिताच्या उपायास कां आळसावें
प्रमाणामधें सर्व कांही असावें ।।४।।



Gomant Dhara Marathi-9_(Goa).indd 63 13-05-2025 06:39:53 PM

स्तुतीला अती बोलती श्वानवृत्ती
अती लोकनिंदा करी दुष्ट चित्तीं
न कोणा उगें शब्द-स्पर्शे डसावें
प्रमाणामधें सर्व कांही असावें ॥५॥

**(आठवणीतल्या कविता)**

**शब्दार्थ व टीपा :**

**कोप** – राग, क्रोध

**उपेक्षा** – दुर्लक्ष

**अ ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) अती कोपामुळे काय होते असे कवी सांगतात?

२) चित्तात सदा कोणती गोष्ट असावी?

३) कोणत्या प्रकारचे बोलणे नीच कृत्य आहे?

४) सत्य कधी दुरावेल असे कवी म्हणतात?

५) कवीने श्वानवृत्ती कशाला म्हटले आहे?

**ब ) खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यांत लिहा.**

१) नम्रता, वाद व औषध हे प्रमाणात असावे असे कवी का म्हणतात?

२) अती मोह, काळजी व लोकनिंदा यासंदर्भात कवीने कोणते विचार व्यक्त केले आहेत?



Gomant Dhara Marathi-9_(Goa).indd 64 5/22/2025 6:05:01 PM

| GOA BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION<br>DISTRIBUTION OF SYLLABUS<br>Grade (Class): IX Subject: MARATHI<br>Academic year 2025-26 | | | | |
|---|---|---|---|---|
| FIRST SEMESTER EXAM | | TIME : 3 hrs. | | प्रथम सत्र परीक्षा |
| पाठ व गुण | कविता व गुण | व्याकरण व गुण | रचना व गुण | एकूण गुण |
| १) तारा आणि जंतू<br>७) म्हणी अशा वहुगुणी<br>४) छत्रीपुराण<br>३) असा हा आसाम!<br>६) प्रयोगशील शेतकरी | ३) तसा तूं भज रे!<br>२) अनंत ब्रम्हांडे<br>५) प्रमाण<br>६) हा देश माझा<br>१०) जगत्कृपाळा तुझी लेकरे | १) वाक्प्रचार (अर्थ व वाक्य)<br>२) शब्दांच्या जाती<br>३) विशेषण<br>४) भाववाचक नाम<br>५) काळ<br>६) लिंग<br>७) वचन<br>८) विरूध्दार्थी शब्द<br>९) समानार्थी शब्द<br>१०) शब्दसमूहाबद्दल एक शब्द<br>११)शुध्द वाक्य ओळखणे<br>१२)विरामचिन्हे<br>१३)अचूक शब्द | १) निबंध - 7<br>२) वृत्तान्त लेखन- 5<br>३) संवाद - 5<br>४) पत्र लेखन – 5<br>(अनौपचारिक पत्र)<br>५) उतारा -5<br>६) गोष्ट - 5 | |
| 19 | 13 | 16 | 32 | 80 |

| SECOND SEMESTER EXAM | | TIME : 3 hrs. | | व्दितीय सत्र परीक्षा |
|---|---|---|---|---|
| पाठ व गुण | कविता व गुण | व्याकरण व गुण | रचना व गुण | एकूण गुण |
| १०) आधी लगीन कोंढाण्याचं<br>८) अंगण<br>५) महिला शास्त्रज्ञ कमला सोहनी<br>९) नामदेव<br>२) मी लेखक कसा झालो? | १) उडाली पक्षीणी<br>४) बिकट वाट वहिवाट नसावी<br>७) माझी मायबोली<br>८) बाप<br>९) गावाकडून येताना | १) वाक्प्रचार (अर्थ व वाक्य)<br>२) शब्दांच्या जाती<br>३) विशेषण<br>४) भाववाचक नाम<br>५) काळ<br>६) लिंग<br>७) वचन<br>८) विरूध्दार्थी शब्द<br>९) समानार्थी शब्द<br>१०) शब्दसमूहाबद्दल एक शब्द<br>११)शुध्द वाक्य ओळखणे<br>१२)विरामचिन्हे<br>१३)अचूक शब्द | १) निबंध - 7<br>२) गोष्ट - 5<br>३) संवाद - 5<br>४) पत्र लेखन – 5<br>(औपचारिक पत्र)<br>५) उतारा - 5<br>६) वृत्तान्त लेखन- 5 | |
| 19 | 13 | 16 | 32 | 80 |

**BLIUPRINT** **IX MARATHI** **Max. Marks: 80** **FIRST SEMESTER 2025/26**

| Sr. No | Objective | Knowledge | | | | Comprehension | | | | Application | | | | Appreciation | | | | Total Row Wise |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Forms of Questions | | | | | | | | | | | | | | | | | |
| | Content Unit / Sub Unit | E (3/4/6) | SA (2) | VSA (1) | O (1) | E (3/4/6) | SA (2) | VSA (1) | O (1) | E (3/4/6) | SA (2) | VSA (1) | O (1) | E (3/4/6) | SA (2) | VSA (1) | O (1) | |
| | गद्य | | | | | | | | | | | | | | | | | |
| 1 | तारा आणि जंतू | | | 5* | 1 | 16* | | | | | | | | | | | | |
| 2 | असा हा आसाम! | | | 4*,8* | 10 | | 13* | | | | | | | | | | | |
| 3 | छत्रीपुराण | | | 6* | 2 | 15* | | | | | | | | | | | | |
| 4 | प्रयोगशील शेतकरी - श्री संजय अनंत पाटील | | | 7* | | 17* | 12* | | | | | | | | | | | |
| 5 | म्हणी अशा बहुगुणी | | | 9* | 3, 11 | | 14* | | | | | | | | | | | 19 |
| | पद्य | | | | | | | | | | | | | | | | | |
| 6 | अनंत ब्रह्मांडे | | | 24* | 20,22 | | | | | | | | | | | | | |
| 7 | तसा तूं भज रे | | | | 18 | 27* | | | | | | | | | | | | |
| 8 | प्रमाण | | | 25* | | 28* | | | | | | | | | | | | |
| 9 | हा देश माझा | | | 23* | 19,21 | | | | | | | | | | | | | |
| 10 | जगत्कृपाळा तुझी लेकरे | | | | | 26* | | | | | | | | | | | | 13 |
| | व्याकरण | | | | | | | | | | | | | | | | | |
| 11 | वाक्प्रचार | | | | | | | | | | | | 29,30 | | | | | |
| 12 | शब्दांच्या जाती | | | | | | | | | | | | 31,32 | | | | | |
| 13 | शब्दसमूहाला एक शब्द | | | | 33,34 | | | | | | | | | | | | | |
| 14 | विराम चिन्हे | | | | | | | | | | | | 35 | | | | | |
| 15 | अचूक शब्द | | | | | | | | | | | | 36 | | | | | |
| 16 | समानार्थी शब्द | | | | 37 | | | | | | | | | | | | | |
| 17 | वाक्य शुद्ध करा | | | | | | | | | | | | 38 | | | | | |
| 18 | भाववाचक नाम | | | | | | | | | | | 39* | | | | | | |
| 19 | विशेषणे बनवा | | | | | | | | | | | 40* | | | | | | |
| 20 | विरुद्धार्थी शब्द | | | 42 | | | | | | | | | | | | | | |
| 21 | लिंग | | | | | | | | | | | 41* | | | | | | |
| 22 | वचन | | | | | | | | | | | 43* | | | | | | |
| 23 | काळ | | | | | | | | | | | 44 | | | | | | 16 |
| | रचना | | | | | | | | | | | | | | | | | |
| 24 | उतारा | | | | | | | 45,46,47 ,48,49, | | | | | | | | | | |
| 25 | संवाद | | | | | | | | | | | | | 50 | | | | |
| 26 | पत्र | | | | | | | | | | | | | 51 | | | | |
| 27 | गोष्ट | | | | | | | | | | | | | 52 | | | | |
| 28 | वृत्तांत | | | | | | | | | | | | | 53 | | | | |
| 29 | निबंध | | | | | | | | | | | | | 54 | | | | 32 |
| | Sub Total | | | 7* | 13 | 12* | 4* | 5 | | | | 4*+1 | 7 | 20+7* | | | | |
| | Total column Wise | 20 | | | | 21 | | | | 12 | | | | 27 | | | | 80 |

Notes :
Figures within brackets to indicate the number of questions.
Figures in the grid indicates question numbers.
Denotes that marks serving combine to form one question.
* Figure indicates optional question.

Summary

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Essay (O) | No. | 11 | Marks | 39 |
| Short answer (SA) | No. | 3 | Marks | 4 |
| Very short answer (VSA) | No. | 20 | Marks | 17 |
| Objective (O) | No. | 20 | Marks | 20 |
| Total | | | | 80 |

Pattern of Options : 2 out of 3
1 out of 2

Scheme of Section

| ARATHI<br>Total No. of Questions : 54<br>STD : IX | TIME: 3 Hours<br>(Printed Pages : )<br>Academic Year 2025 - 2026 | Subject Code :<br>Maximum Marks: 80 |
|---|---|---|

सूचना : (i)प्रश्नांचा क्रमांक स्पष्टपणे लिहा.
(ii)सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.
(iii)उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

| | | |
|---|---|---|
| | खालीलपैकी अचूक पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करून पुन्हा लिहा. | 3 |
| 1. | भगदत्ताने आणलेल्या यंत्रातून ---------------------<br>• आकाशातल्या चांदण्या मोठ्या दिसायच्या.<br>• डोळ्यांना न दिसणारे बारीक जंतू दिसायचे.<br>• पांढऱ्याशुभ्र फुलांचा सडा दिसायचा.<br>• हिमालयाचे शिखर दिसायचे. | |
| 2. | कधीकधी छत्रीचा पुरता निकाल लावण्याच्या बाबतीत -------------------<br>• झुरळे घुशींचे प्रयत्न पुरेसे पडत नाहीत.<br>• झुरळे उंदरांचे प्रयत्न पुरेसे पडत नाहीत.<br>• मुलांचे प्रयत्न पुरेसे पडत नाहीत.<br>• बायकोचे प्रयत्न पुरेसे पडत नाहीत. | |
| 3. | कोल्हा शेतातून फिरत असताना त्याला अचानक ----------------<br>• काकडीचा वेल दिसतो.<br>• द्राक्षांचा वेल दिसतो.<br>• पडवळीचा वेल दिसतो.<br>• भोपळ्याचा वेल दिसतो. | |
| | खालील कोणतेही दोन उद्गार कोणी कोणास उद्देशून काढले आहेत ते लिहा. | 2 |
| 4. | " चहाच्या झाडाचे आयुष्य किती?" | |
| 5. | "हल्ली रोज रात्री मला एक स्वप्न पडतं." | |
| 6. | "मी पुरता भिजलो असतो." | |
| | खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. | 2 |
| 7. | शेतीतंत्रात संजय भाईनी कोणत्या तीन घटकांचा बारकाईने अभ्यास केला? | |
| 8. | गोहाटीच्या जोडशहराचे नाव काय आहे ? | |
| 9. | नोकर देवळातले धुपाटणे घेऊन वाण्याकडे का गेला? | |
| 10. | 'असा हा आसाम' हा पाठ कोणी लिहिला आहे? | 1 |
| | • डॉ सोमनाथ कोमरपंत<br>• प्रा. मुक्ता गरसोळे कुलकर्णी<br>• विजय नारायण कापडी<br>• उषा केशव पाणंदीकर | |
| 11. | 'काळ हा पुढे चालूच राहतो.' हे वाक्य कोणत्या पाठातील आहे? | 1 |
| | • छत्रीपुराण<br>• म्हणी अशा बहुगुणी<br>• तारा आणि जंतू<br>• प्रयोगशील शेतकरी | |
| | खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन ते तीन वाक्यांत लिहा. | 4 |
| 12. | भाईंनी आत्मनिर्भर शेतीची कल्पना मनात कशासाठी रुजविली? | |
| 13. | आसामी स्त्रिया कोणकोणती कामे करतात? | |
| 14. | म्हणींमुळे आपल्याला कोणता फायदा होतो? | |
| | खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी चार ते पाच वाक्यांत लिहा. | 6 |
| 15. | छत्रीचे अन्य कोणते उपयोग लेखकाने सांगितले आहेत? | |
| 16. | सारे गाव भयभीत का झाले? | |

| | | |
|---|---|---|
| 17. | लेखकाने सावईवेरे गावाच्या परिसराचे वर्णन कसे केले आहे? | |
| | खालीलपैकी अचूक पर्याय निवडून कवितेच्या ओळी पूर्ण करून पुन्हा लिहा. | 3 |
| 18. | म्हणे सोहिरा ------------------------------<br>• आपुल्या मुळाला<br>• देव भक्त एकचि होती।<br>• तसा तू भज रे !<br>• कोठें तें वन,कोठें जीवन | |
| 19. | जरी अनेक अपुले धर्म---------------------------<br>• सदैव अपुली माणुसकीची नाती<br>• फुंका रे तुतारी<br>• जरी अनेक अपुल्या जाती<br>• वाहून जाऊ द्या रे! | |
| 20. | पृथ्वी जेणे तृप्त केली------------------<br>• त्यासि गौळणी कडिये घेती<br>• भोग भोगून ब्रम्हचारी<br>• त्यासि यशोदा भोजन घाली<br>• विश्वव्यापक कमळापती | |
| | खालील कवितांच्या ओळीतील मोकळया जागी पर्यायी शब्दांपैकी योग्य शव्द घालून ओळी पूर्ण करून पुन्हा लिहा. | 2 |
| 21. | हे बंद करा उत्पात्.......आपुला घात<br>• रोखा<br>• अडवा<br>• थांबवा<br>• संपवा | |
| 22. | नवल केव्हडें केव्हडें। न ------ कान्होबाचे कोडें ।।<br>• समजे<br>• जाणे<br>• कळे<br>• उमजे | |
| | खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. | 2 |
| 23. | कवी बापट यांनी कोणते हात रोखायला सांगितले आहेत? | |
| 24. | हरी बालकरुपात कोणा घरी अवतरला? | |
| 25. | सत्य कधी दुरावेल असे कवी आठल्ये म्हणतात ? | |
| | खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत लिहा. | 6 |
| 26. | कवी शिवानंद बाक्रे ईश्वरचरणी कोणती प्रार्थना करतात ? | |
| 27. | भक्ताने देवाला आपलेसे करावे, हे सोहिरोबानाथांनी कसे स्पष्ट केले आहे? | |
| 28. | अती मोह, काळजी व लोकनिंदा याबाबत कवी आठल्ये यांनी कोणते विचार मांडले आहेत? | |
| 29. | ' धडा शिकवणे' या वाक्प्रचाराचा अचूक अर्थ निवडून लिहा.<br>• आज्ञा देणे<br>• पाठ शिकवणे<br>• अद्दल घडवणे<br>• निश्चितपणे माहिती देणे | 1 |
| 30. | 'फडशा पाडणे' या वाक्प्रचाराच्या उपयोगाचे खालीलपैकी कोणते वाक्य बरोबर आहे?<br>• मुलांनी मिठाईचा फडशा पाडणे.<br>• मुलांनी मिठाईचा फडशा पाडला.<br>• मुलांनी मिठाई खाऊन संपवणे.<br>• मुलांनी मिठाई खाऊन संपवली. | 1 |
| 31 | ते दोघे मित्र काही काळ फिरत राहिले. या वाक्यातील 'दोघे '<br>• नाम. • विशेषण • सर्वनाम. • क्रियापद | 1 |

| | | |
|---|---|---|
| 32. | त्यांचे निरीक्षण आणि अभ्यासूवृत्ती कामी आली. या वाक्यातील 'आणि'<br>• क्रियाविशेषण अव्यय<br>• शब्दयोगी अव्यय<br>• उभयान्वयी अव्यय<br>• केवलप्रयोगी अव्यय | 1 |
| 33. | पाठीवर अडकवायची टोपली म्हणजे-<br>• थाम • अलगूज • थापी • चिलखत | 1 |
| 34. | 'बकाणा' म्हणजे<br>● गोड खाद्यपदार्थाचा मोठा घास<br>● तेलकट खाद्य पदार्थाचा मोठा घास<br>● चमचमीत खाद्यपदार्थाचा मोठा घास<br>● कोरड्या खाद्यपदार्थाचा मोठा घास | 1 |
| 35. | पुढील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य विरामचिन्ह निवडा.<br>तू काही विद्या घेऊन आलायस की नाही<br>● !<br>● ?<br>● •<br>● : | 1 |
| 36. | खालीलपैकी अचूक शब्द ओळखून लिहा.<br>● निश्चेष्ट<br>● नि:चेष्ट<br>● नीश्चेष्ट<br>● निस्टेष्ट | 1 |
| 37. | 'उपवन' या शब्दाचा समानार्थी शब्द<br>● जंगल<br>● बाग<br>● सरोवर<br>● मळा | 1 |
| 38. | खालील वाक्यांपैकी शुद्ध वाक्य निवडून लिहा.<br>● माझा सारा वीश्वास उडाला होता.<br>● माजा सारा विस्वास उडाला होता.<br>● माझा सारा विश्वास उढाला होता.<br>● माझा सारा विश्वास उडाला होता. | 1 |
| 39. | खालीलपैकी कोणत्याही एका शब्दाचे भाववाचक नाम लिहा.<br>● सुंदर<br>● अभिमानी | 1 |
| 40. | खालीलपैकी कोणत्याही एका शब्दाचे विशेषण लिहा.<br>● कल्पना<br>● कष्ट | 1 |
| 41. | खालीलपैकी कोणत्याही एका शब्दाचे लिंग बदलून लिहा. | 1 |
| | ● लेखक<br>● आजोबा | |
| 42. | खालीलपैकी कोणत्याही एका शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहा. | 1 |
| | ● वृद्ध<br>● विजय | |
| 43. | खालीलपैकी कोणत्याही एका शब्दाचे वचन बदलून लिहा : | 1 |
| | ● छत्री<br>● शिंग | |
| | खालील वाक्य भविष्यकाळात लिहा. | 1 |
| 44. | बाहेर पाऊस पडतो. | |

| | | |
|---|---|---|
| | पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा: | 5 |
| | स्वच्छता राखणे हा आपल्या जीवनशैलीचा भाग बनला पाहिजे. बाह्य स्वच्छता व आंतरिक स्वच्छता या स्वच्छतेच्या दोन बाजू आहेत. आपले घर, गाव किंवा शहर ,राज्य स्वच्छ राखणे हे प्रत्येकाने स्वत:चे कर्तव्य मानले पाहिजे. स्वच्छता राखली नाही तर अनेक प्रकारचे रोग पसरतात. अनारोग्याला तोंड द्यावे लागते. समाजात अनेक ठिकाणी लोक स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात. त्याचे परिणाम सर्वांनाच भोगावे लागतात. स्वच्छता राखणे ही फार मोठी देशसेवा आहे. अनेक संतांनी, समाज सुधारकांनी आंतरिक स्वच्छतेला फार मह-त्वाचे मानले. माणसाच्या मनातले लोभ, अहंकार, मत्सरासारखे दुर्गुण नष्ट झाल्याशिवाय आंतरिक स्वच्छता राखता येणार नाही.त्यासाठी मनात चांगले विचार यायला हवेत. मन निर्मळ राखण्यासाठी सत्य, सेवा यांचे पालन केले पाहिजे.बाहेरची साफसफाई करणे तसे सोपे असते. आंतरिक स्वच्छता राखणे ही फार मोठी साधना आहे. त्यासाठी स्वत:शी सतत संघर्ष करावा लागतो.<br>प्रश्न: | |
| 45. | स्वच्छतेच्या दोन बाजू कोणत्या आहेत? | |
| 46. | मन निर्मळ राखण्यासाठी काय करायला हवे ? | |
| 47. | प्रत्येकाने कोणते कर्तव्य बजावले पाहिजे? | |
| 48. | उता-यामध्ये आंतरिक स्वच्छतेला साधना का म्हटले आहे? | |
| 49. | उताऱ्याला योग्य शीर्षक लिहा. | |
| 50. | दुकानदार व गि-हाईक यांच्यामध्ये झालेला संवाद पाच ते सहा ओळींत लिहा. | 5 |
| 51 | मानस /मानसी रायकर, 'कृष्णकुंज', पणसुले, काणकोण - गोवा येथून आपला मित्र /आपली मैत्रीण तनय/ तनया याला राज्यपातळीवर आयोजित कथाकथन स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाल्याबद्दल अभिनंदन करणारे पत्र लिहितो/लिहिते.पत्राचा नमुना दहा ते बारा वाक्यांत तयार करा. | 5 |
| 52. | खालील अपूर्ण गोष्ट दहा ते बारा ओळींत पूर्ण करून तिला योग्य शीर्षक लिहा.<br>एका गावात रामू नावाचा तरुण राहत होता. तो खूप आळशी होता. त्याच्या आईवडिलांनी त्याला खूप समजावले पण रामूच्या वागण्यात काहीच बदल झाला नाही. एक दिवस रामू........ | 5 |
| 53 | शारदा विद्यालय ,फोंडा –गोवा या शाळेत साजरा झालेल्या स्वातंत्र्य दिनाचा ( १५ ऑगस्ट)वृत्तान्त खालील मुद्द्यांच्या आधारे दहा ते बारा वाक्यांत लिहा.<br>स्वातंत्र्य दिन – प्रमुख पाहुणे – स्वागत,परिचय कोणी केला-ध्वजारोहण ,राष्ट्रगीत — विद्यार्थ्यांची भाषणे – देशभक्तीपर गीत –प्रमुख पाहुण्यांच्या भाषणातील दोन मुद्दे –आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन कोणी केले. | 5 |
| 54. | खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सोळा ते अठरा ओळींत निबंध लिहा. | 7 |
| | • वेळेचे महत्व<br>• माझे आवडते पुस्तक<br>• शेतकऱ्याचे आत्मवृत्त<br>• भ्रमणध्वनीचे(मोबाईलचे) फायदे व तोटे | |
| | **टीप** :<br>• गोष्ट लेखनामध्ये सुरुवातीच्या २-३ ओळी दिल्या जातील. विद्यार्थ्यांनी त्या व्यतिरिक्त १० - १२ ओळींत गोष्ट पूर्ण केली पाहिजे. | |